ग्रामीण नळ पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा करण्यासाठी मंत्रीमंडळ उप समितीची स्थापना करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-१११०/प्र.क्र.०६९/पापु-०७

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : ५ एप्रिल, २०१०

**वाचा:** १) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापापु-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दिनांक १७ मार्च, २०१०

**प्रस्तावना:**

गेली अनेक वर्षे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची आखणी करताना, किमान २० तास वीज पुरवठा गृहीत धरून योजना आखल्या गेल्या आहेत. मात्र, ग्रामीण भागात वीज कपातीचा प्रश्न गंभीर झाला असल्याने, अनेक योजना निरर्थक / कालबाह्य ठरत आहेत. अनेक योजना ग्रामपंचायतींच्या आर्थिक क्षमतेअभावी वीज बीले थकल्याने बंद पडत आहेत. अपु-या पावसामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. त्यामुळे, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा करण्याची आणि यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

प्रस्तावनेत नमूद बाबी विचारात घेऊन, ग्रामीण नळ पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे मंत्रीमंडळ उप समितीची स्थापना करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अध्यक्ष |
| २) मा.मंत्री, गृह | सदस्य |
| ३) मा.मंत्री, जलसंपदा व उर्जा | सदस्य |
| ४) मा.मंत्री, सामाजिक न्याय | सदस्य |
| ५) मा.मंत्री, परिवहन | सदस्य |
| ६) मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता व ग्राम विकास | सदस्य |
| ७) सचिव, उर्जा | निमंत्रित सदस्य |
| ८) सचिव, ग्राम विकास | निमंत्रित सदस्य |
| ९) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य सचिव |

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००३२६१४४५०६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. निपूण विनायक)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,

मा.मंत्री (गृह ) यांचे खाजगी सचिव,

मा.मंत्री (जलसंपदा व उर्जा) यांचे खाजगी सचिव,

मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव,

मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव

खाजगी सचिव, मा.मंत्री (सर्व)

खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (सर्व)

विभागीय आयुक्त (सर्व)

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई